# जागतिक स्तरावर ठरतात कृषी मालाचे भाव

## शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न : गडकरी

**नागपूर.** शेतकऱ्यांना जास्तीत भाव मिळावा, यासाठी सरकार प्रयत्न रत आहे. सिंचनासाठी शेतकऱ्यांच्या बांधावर पाईपलाईनने पाणी मिळावे, शेतीसह जोडधंदा निर्माण व्हावा, या उद्देशाने एक झाड-एक गाय देण्याची योजना आहे. तसेच मत्स्योत्पादनाला चालणा देण्याकडे कल आहे. मात्र जागतिकस्तरावर कृषी मालाचे भाव निश्चित होत असल्याने शेतकऱ्यांना अधिकचा भाव मिळत नाही, असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी पत्रपरिषदेतून सांगितले. ॲग्रोव्हिजन प्रदर्शनीचे आयोजन 10 ते 13 नोव्हेंबरदरम्यान करण्यात आले. त्याबाबतची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रपरिषदेत ते बोलत होते.

## बांबू विदर्भाची अर्थव्यवस्था बदलविणार



विदर्भात बांबूचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. राज्य शासनाने बांबू नुकतेच टीपीमुक्त केला. त्यामुळे एका ठिणावरून दुसऱ्या ठिकाणी नेण्यासाठी शासकीय परवानगीची गरज नाही. बांबूपासून बायो इथेनॉल, पेपर, कापड, अगरबत्तीच्या काड्या, फर्निचर, हॉटेल्समधील टाईल्स तयार होतात. विशेष म्हणजे बांबूपासून अत्यंत सुरेख शर्ट तयार होतात. शेतकऱ्यांनी शेतात उत्पादन घेतल्यास वादळापासून पिकांचे संरक्षणही होते. बांबूवर लक्ष केंद्रीत केल्यास विदर्भाची अर्थव्यवस्था बदलविण्याची क्षमता त्यात असल्याचे त्यांनी सांगितले. झुडपी जंगल व डब्ल्युसीएलच्या मोकळ्या जागेवर बांबू लावण्याची योजना आहे. यातून 5 लाख युवकांना रोजगार मिळणार, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## समुद्रात जाणारे पाणी अडविणार


राज्यातील नद्यांचे पाणी समुद्रात वाहुन जाते. ते पाणी अडवून संचय केल्यास संपूर्ण महाराष्ट्रातील पाणी प्रश्न सुटू शकतो. सध्या तापी व कोयना नदीचे पाणी अडविण्याची योजना आहे. परिणामी, उत्तर महाराष्ट्र व मराठवाड्यातील पाणी प्रश्न कायमचा निकाली निघेल. यासाठी महाराष्ट्र व गुजरातला प्रत्येकी 1 हजार कोटी दिले जातील. येत्या तीन महिन्यात कामाला प्रारंभ केला जाईल, असे त्यांनी सांगितले.

## दुबईतून 56 टन मधाची ऑर्डर

एकाच प्रकारचे मध मिळणे शक्य होत नाही. विदर्भात मोठ्या प्रमाणात जंगल असून त्याचा उपयोग मध उत्पादनासाठी करण्याची योजना आहे. दुबईतून 56 टन एकाच प्रकारच्या मधाची ऑर्डर असल्याची माहिती त्यांनी दिली. विदर्भात मालगुजारी तलाव मोठ्या प्रमाणात आहे. विविध सामाजिक संस्थांची मदत घेऊन त्या तलावांचे खोलीकरण करण्यात येईल. त्या तलावांचा उपयोग मत्स्योत्पादनासाठी करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## तलावात बुडून शेतकऱ्याचा मृत्यू

**उमरेड.** उमरेड लगतच्या पेंढराबोडी तलाव ओव्हरफ्लो झाल्याने येथील नाल्याला पूर आला. स्थानिक कळमना येथील रहिवासी शेतकरी गोविंदा आडकू सरोदे (70) हा पाण्याच्या प्रवाहात सापडल्याने बुडून मृत्यू झाला. सरोदे हा एसटीने चारगांव येथून आपल्या मुलीला भेटून कळमना फाट्याजवळ उतरले. मात्र त्यानंतर सरोदे दिसून आले नाही. ते थी च मा कुटूंबियांनी त्यांचा शोध घेतला मात्र ते सापडले नाही. तलावाजवळ शोध घेण्यात आला.



नाल्यावरील दगडावर एक शव आढळून आले. या घटनेची तक्रार किशोर सुभाष सरोदे यांनी पोलिस स्टेशनला दिली. पोलिसांनी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला. मृतक एका हाताने दिव्यांग होता. तसेच कळमना येथे पायीच पेंढराबोडी तलावाच्या ओव्हरफ्लो नाल्याजवळून जात होता.